<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. १</u>

मी शपथपूर्वक खरे सांगतो की

<u>सं.फौ.ख.क्र.११७९/२०१५</u>
सरकार विरूध्द श्रीचंद्र
निशाणी – ५

माझे नाव – मोतीराम यादवराव ठाकरे
वय – अंदाजे ६५ वर्ष, व्यवसाय – शेती
राहणार – कांद्री, कन्हान.

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जी. ओ. वर्मा यांच्या कडून**

दिनांक १२.१०.२०१३ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनाम्याकरीता बोलविले होते का हे मला आठवत नाही. पोलीसांनी माझ्या समक्ष काहीही केले नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर अनुक्रमांक २ कडे माझी सही आहे. त्यातील मजकूर माहिती नाही. सहीस **<u>निशाणी ६</u>** देण्यात येते.

**(साक्षीदार हा त्याच्या पूर्वीच्या जबाबाप्रमाणे कथन करीत नसल्यामुळे त्यास सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

हे म्हणणे खरे नाही की दिनांक १२.१०.२०१३ रोजी पोलीसांनी माझे समक्ष कांद्री, कन्हान येथे एन.एच.–७ रोड वरील एम.एस.ई.बी. ऑफिस समोर रस्त्यावर बोलविले होते, तेथे माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की तो पंचनामा मला वाचून दाखविला व तो बरोबर असल्याने मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकीलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. आरोपी हजर. त्यांने उलटतपास नाकारला, सबब उलटतपास नाही.**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.08.26 16:49:40 +0530

कामठी
दिनांक २५/०८/२०२५

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी